अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

MO.9860898564

संपादक - दिपक थोरात

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -५१ | बुधवार दि.०८ नोव्हेंबर २०२३ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -51 | WEDNESDAY DT. 08 NOVEMBER 2023 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

## बीड जिल्हा भाजपा संघर्षयोध्दा जनसंपर्क कार्यालयास लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांची भेट



मराठा आरक्षण आंदोलन दरम्यान ३० ऑक्टोंबर २०२३ रोजी बीड शहरात घडलेल्या जाळपोळ घटनेत भारतीय जनता पार्टी जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांचे कार्यालयाची तोडफोड करण्यात आली. कार्यालय जाळण्याचा अयशस्वी प्रयत्न केला गेला. कार्यालयाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले....भाजपा राष्ट्रीय सचिव लोकनेत्या पंकजाताई गोपीनाथराव मुंडे, आणि मा.खा.डॉ. प्रितमताई मुंडे यांनी नगर रोड वरील भाजपा जिल्हा कार्यालयास भेट देऊन घटनेची माहिती घेवून नुकसानीची पाहणी केली. प्रसंगी जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, अशोक लोढा, प्रा. देविदास नागरगोजे,नवनाथ शिराळे, विक्रांत हजारी, सलीम जहांगीर, डॉ.लक्ष्मण जाधव, अजय सवाई,कृष्णा तिडके, एड. संगीता धसे, सुनील मिसाळ सौ.मिराताई गांधले, अनिल चांदणे, चंद्रशेखर महाद्वार, संतोष राख, अश्विन शेळके, ज्ञानेश्वर आंधळे, आप्पासाहेब झोडगे, राजू शहाणे, सतीश कळसुले, युवराज मस्के, बद्रीनाथ जटाळ, महेश सावंत, हिरामण शिंदे, शाम कोठुळे, सचिन आगाम, बाळासाहेब गात, अनिल शेळके, चव्हाण टेलर, अजय ढाकणे, बंडू मस्के, श्याम कोठुळे, गणेश लांडे, शफिक पेंटर, आदी सह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# आम्हाला ओबीसीतून बाहेर ढकलण्याचा प्रयत्न

## छगन भुजबळांचा आपल्याच सरकारवर गंभीर आरोप

मुंबई: मराठा आरक्षणाचा प्रश्न पेटलेला असतानाच आता ओबीसी आरक्षणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी ओबीसी आरक्षणासंदर्भात आक्रमक भूमिका घेतली आहे. आम्हाला ओबीसीतून बाहेर ढकलण्याचा सरकारचा डाव असल्याचा आरोप छगन भुजबळ यांनी केला आहे. मराठा आरक्षणाला विरोध नाही पण ओबीसीमधून त्यांना आरक्षण नको अशी भूमिका त्यांनी घेतली आहे. राज्याचे मंत्री आणि ओबीसी नेते छगन भुजबळ म्हणाले की, ज्यांना कायदेशीर आरक्षण देऊ शकत नाही, त्यांना मागच्या दाराने कुणबी सर्टिफिकेट द्यायचं आणि आरक्षणाला लाभ द्यायचा प्रयत्न सुरू आहे. दुसऱ्या बाजून जे ओबीसी समाजाचे आहेत त्यांना हायकोर्टामध्ये लढून ओबीसीमधून बाहेर ढकलायचं असा दुहेरी कार्यक्रम सुरू आहे.

छगन भुजबळांनी ओबीसीमधून मराठा आरक्षणाला विरोध केल्यानंतर त्यावर मनोज जरांगे यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. ते म्हणाले की, करेंगे या मरेंगे हा त्यांचा प्रश्न. आमचं वाक्य आहे लडेंगे और जितेंगे. आम्हाला अजून आरक्षण मिळाले नाही, मग आम्ही अतिक्रमण कुठं केले? आम्ही जे मागतोय ते आमच्या हक्काचं मागतोय.

### प्रकाश शेंडगेंचा छगन भुजबळांना पाठिंबा

ओबीसी समाजात मराठा समाजाला घुसविण्याचा प्रयत्न आम्ही होऊ देणार नाही अशी प्रतिक्रिया ओबीसी नेते प्रकाश शेंडगे यांनी दिली आहे. छगन भुजबळांनी सरकारमध्ये राहून संघर्ष करावा, आम्ही बाहेर राहून संघर्ष करणार, असं भुजबळांना सांगितल्याची प्रकाश शेंडगे म्हणाले.

तसेच ओबीसी आरक्षण टिकवण्यासाठी लाखोंच्या संख्येने रस्त्यावर उतरणार असून १७ नोव्हेंबरला अंबडमध्ये ओबीसी मोर्चा काढण्यात येणार असल्याची घोषणाही प्रकाश शेंडगे यांनी केली. शिंदे समितीच्या नियुक्तीविरोधात ओबीसी संघटना कोर्टात जाणार असल्याचंही ते म्हणाले.



**महत्वाचे**



## सरकारचं ठरलं! 'या' चार मंत्र्यांचे शिष्टमंडळ करणार मनोज जरांगेंसोबत चर्चा

मराठा समाजाचे बैठकीकडे लक्ष

मुंबई : मराठा आरक्षण आणि कुणबी प्रमाणपत्राबाबत पुढील चर्चा करण्यासाठी राज्य सरकारचे शिष्टमंडळ आज मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्या भेटीसाठी रवाना होणार आहेत. सरकारने यासाठी चार मंत्र्यांची नावेही निश्चित केली आहेत. आज संध्याकाळपर्यंत चार मंत्र्यांचे शिष्टमंडळ मनोज जरांगे यांच्यासोबत चर्चा करणार असल्याची माहिती आहे.

या चार मंत्र्यांचे शिष्टमंडळ...

जरांगे पाटील यांच्या भेटीला सरकारचे शिष्टमंडळ जाणार आहे.चार मंत्र्यांचे शिष्टमंडळ भेट घेणार आहे. या मंत्र्यांच्या शिष्टमंडळात उदय सामंत, शंभूराजे देसाई, धनंजय मुंडे, संदीपान भुमरे यांचा समावेश आहे. जरांगे पाटील यांच्या भेटीसाठी आजच शिष्टमंडळ रवाना होणार आहे.

दोनदा मुहूर्त देखील हुकला...

मराठा आरक्षणासाठी उपोषण करणारे मनोज जरांगे यांच्यावर छत्रपती संभाजीनगरच्या रुग्णालयात उपचार सुरु आहे. दरम्यान, सोमवारी एक शिष्टमंडळ जरांगे यांच्या भेटीला येणार असल्याची माहिती खुद्द जरांगे यांनी दिली होती. मात्र, काही कारणास्तव शिष्टमंडळाचा हा दौरा रद्द झाला. त्यानंतर ७ नोव्हेंबरला म्हणजेच मंगळवारी हे शिष्टमंडळ येत असल्याची माहिती जरांगे यांना मुख्यमंत्री कार्यालयातून देण्यात आली होती. परंतु, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे श्रीनगरच्या दौऱ्यावर गेल्याने शिष्टमंडळाचा दौरा पुन्हा रद्द करण्यात आले.

# अवेळी कोसळधार! राज्यात अनेक ठिकाणी पावसाच्या जोरदार सरी, पुढील ३ तास महत्वाचे, अलर्ट राहा!

## पुढील ३ तास महत्वाचे

राज्यात आज सकाळपासून अनेक जिल्ह्यांत पावसाने हजेरी लावली आहे. हिवाळ्यात कडाक्याच्या थंडी ऐवजी मुसळधार पाऊस कोसळत आहे. रायगडमध्ये जोरदार पाऊसाने हजेरी लावलीये. पावसामुळे भात शेतीच नुकसान होण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

सकाळपासून उन्हाने दडी मारल्याने रायगडमध्ये ढगाळ वातावरण निर्माण झालं होतं. रायगड जिल्ह्यातील पोलादपुर, महाड, माणगाव, पाली परीसराला पावसाने झोडपले आहे. शेतात कापून ठेवलेले भाता पिक पावसाच्या पाण्यात बुडून गेलेय.या वर्षी उशिरा सुरु झालेल्या पावसाने शेतकऱ्याची चिंता वाढवली होती. मात्र पाऊस जरी उशिरा सुरु झाला असलातरी प्रमाणात पडल्याने भातशेतीची पिके चांगली आली होती. परंतु आज दुपारी अचानक सुरु झालेल्या पावसाने पोलादपुर,



महाड, माणगाव, म्हसळा, रोहा, सुधागड तालुक्यांना चांगलेच झोडपलेय.अचानक आलेल्या या पावसाने जनजीवन विस्कळीत झाले आहे. तर सर्वात मोठा फटका येथील शेतकऱ्याला बसलाय. भाताचे पिक तयार झाले असून अनेक ठिकाणी कापलेले भाताचे पिक शेतात वाळवण्यासाठी ठेवलेले आहे. अचानक आलेल्या या पावसामुळे भात पिकाचे मोठे नुकसान झाले असून येथील शेतकरी हवालदिल झाला आहे.

बुधवारी पहाटेपासूनच कोल्हापूर जिल्ह्यात मुसळधार पाऊस सुरू झालाय . हातकणंगले तालुक्यातील घुणकी या गावात मुसळधार पाऊस पडल्याने संपूर्ण गाव तसेच शेतांमध्ये पाणीच पाणी झालेय. अरबी समुद्रात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याने कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रामध्येही मुसळधार पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला होता. त्यानुसार, आज पहाटेपासूनच कोल्हापूर जिल्ह्यात पावसाला सुरुवात झाली.यासह सांगली जिल्ह्यातील शिराळा, जत, पलूस, तासगाव,खानापूर तालुक्यात पावसाने हजेरी लावलीये. दिवाळीत थंडी सुरू होण्याची अपेक्षा असताना पावसाचे आगमन छाटणी झालेल्या आणि फुलोऱ्यात आलेल्या द्राक्ष बागांना धोका ठरणारे आहे. जिल्ह्यात सर्वत्र ढगाळ हवामान असून काही भागात हलका ते मध्यम पाऊस झाला.शिराळा तालुक्यातील मांगले परिसरात पहाटेपासून पाऊस सुरु होता. तासगाव, पलूस, खानापूर, जत भागात पहाटेपासून पावसाला सुरुवात झाली. सुमारे अर्धातास हलका पाऊस पडला. द्राक्षाच्या फळछाटण्या झाल्या असून सध्या द्राक्ष घड कळी, फुलोऱ्याच्या स्थितीत असून यामध्ये पावसाचे पाणी साचल्याने बुरशीजन्य दावण्या रोगाचा प्रादुर्भाव बळावण्याची शक्यता आहे.

आज सकाळी पंढरपूर आणि परिसरात पावसाच्या हलक्या सरी कोसळल्या. या पावसामुळे हवेत गारवा निर्माण झाला आहे. सध्या थंडीचे दिवस सुरु असतानाच अवकाळी पाऊस झालाय. तालुक्यातील निमगाव, उपरी या भागात चांगला पाऊस झाला. अचानक आलेल्या पावसामुळे ऊस तोडीच्या कामांवर परिणाम झाला आहे.

# शहागडमध्ये ५०० च्या डुप्लीकेट नोटा पकडल्या

## ५०० रुपयच्या १३ बनावट नोटा आढळून



शहागड : अंबडमध्ये कित्येकदा व्यापार्यांना पैशांच्या बंडल मध्ये ५०० च्या डुप्लीकेट नोटा सापडल्याने खळबळ उडाली आहे. एक व्यापारी व्यावसायिक बँकेत पैसे जमा करण्या करिता गेला असता सर्व नोटा डुप्लीकेट असल्याचे लक्षात आले. सोमवारी मध्यरात्री पाचोड (ता.पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर) च्या पोलीस पथकाने शहागड (ता.अंबड) येथील सचिन मधुकर जाधव, व अप्पासाहेब पवार, अंकुश नगर येथील कुंदन सुधाकर जगताप तरुणाला ताब्यात घेतले, व त्यांच्या जवळील कार एम.एच.०४.जीएम.२५५२, ताब्यात घेतली असल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

पाचोड पोलिसांनी कुंदन जगताप याची झाडाझडती घेतली असता, ५०० रुपयच्या १३ बनावट नोटा आढळून आले. तसेच शहागड येथील सचिन जाधव याच्याकडे ५०० च्या ३१ बनावट नोटा मिळून आल्या आहेत.



## सणासुदीच्या काळात दुकानांना अधिकचा वेळ वाढवून देण्यासाठी पोलीस अधिक्षकांना बीड जिल्हा व्यापारी महासंघाचे निवेदन

बीड (प्रतिनिधी)

दिवाळीचा सण अवघ्या काही दिवसांवर आला असल्याने जिल्ह्यातील व्यापार्यांना आपापली दुकाने रात्री अधिक कालावधीकरीता सुरु ठेवण्यासाठी व अधिकचा वेळ वाढवून देण्याबाबत बीड जिल्हा व्यापारी महासंघाच्यावतीने बुधवार दि.८ रोजी पोलीस अधिक्षक नंदकुमार ठाकूर यांची भेट घेवून त्यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, जिल्ह्यातील व्यापार्यांना आप-आपली दुकाणे, प्रतिष्ठाणे रात्री १० च्या आत बंद करण्यासाठी पोलीस प्रशासनाने वेळेचे बंधन घातले आहे. मात्र अवघ्या दोन-चार दिवसांवर दिपावलीचा सण आलेला असल्याने ग्राहक आपल्या सोयीनुसार म्हणजे रात्री १० वाजल्यानंतर देखील खरेदीसाठी येत आहेत. दुष्काळाच्या संकटामुळे आणि सणा-सुदीच्या काळात व्यापार्यांना वेळेच्या बंधनात शिथिलता द्यावी अशी मागणी निवेदनाद्वारे मराठवाडा चेंबर्स ऑफ कॉमर्सचे वाय.जनार्दन राव, राजेंद्र मुनोत, बीड जिल्हा व्यापारी महासंघाचे अध्यक्ष भास्करराव जाधव, कार्याध्यक्ष अशोकराव शेटे, बीड शहराध्यक्ष प्रकाशराव कानगावकर, तालुकाध्यक्ष राजेंद्र बनसोडे, सचिव सुर्यकांत महाजन, बालाप्रसाद जाजू, जवाहरसेठ कांकरिया, महासचिव तुकाराम साळुंके, सुदाम चव्हाण, सुभाष उगले, बालाप्रसाद चरखा, गंगाभिषण करवा यांनी केली आहे.

# पोलिसांवर खापर फोडण्याऐवजी हल्ल्या मागील सूत्रधाराला हुडकून काढण्याची गरज - एस.एम.युसूफ

**बीड (प्रतिनिधी) गेल्या आठवड्यात बीड शहर आणि माजलगावात लोकप्रतिनिधींच्या घरांवर झालेले हल्ले तसेच राजकीय पदाधिकाऱ्यांच्या कार्यालयांवरील हल्ल्यातील खऱ्या सूत्रधाराला हुडकून काढण्याची खरी गरज असताना राजकीय क्षेत्रातील मंत्रीसंत्री व आमदारांसह कार्यकर्त्यांकडून नुसते पोलिसांवर खापर फोडणे सुरू झाले आहे. साप निघून गेल्यावर जमिनीवर दांडकं आदळत बसण्यात अर्थ नाही. त्यापेक्षा हल्ल्यामागील सूत्रधाराला हुडकून काढून त्याला कठोर शासन करण्याची खरी गरज आहे. यामुळे राज्यातील मंत्री, आमदार, राजकीय नेते व कार्यकर्त्यांनी याकडे लक्ष देऊन योग्य ती कारवाई करणे आवश्यक आहे. असे मत अखिल भारतीय पोलीस हक्क संरक्षक संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष तथा मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून व्यक्त केले आहे.**

याविषयी दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात नमूद केले आहे की, काही दिवसांपूर्वी बीड शहरातील माजीमंत्री, विद्यमान आमदार, माजी नगराध्यक्ष, बीड नगर परिषदेतील माजी स्वीकृत सदस्य यांच्या बंगल्यावर दगडफेक करून समाजकंटकांनी बंगल्याच्या आवारात असलेल्या चार चाकी व दुचाकी वाहने जाळून टाकली. याशिवाय एका पक्षाचे जिल्हाप्रमुख आणि माजीमंत्री यांचे कार्यालय ही जाळून टाकले. एका पक्षाच्या जिल्हा प्रमुखांचे कार्यालय ही तोडफोड करण्यात आले. याशिवाय एका मंत्र्यांच्या खंद्या समर्थकांचे हॉटेल ही जाळण्यात आले तसेच राष्ट्रवादी भवन च्या प्रांगणातही आग लावण्यात आली. याशिवाय माजलगाव येथील विद्यमान आमदारांच्या बंगल्यालाही आग लावण्यात आली. तेथेही अनेक चारचाकी व दुचाकी वाहनांची राख रांगोळी करण्यात आली. या सर्व घटना बीड जिल्ह्याच्या इतिहासात म्हणण्यापेक्षा बीड जिल्ह्याच्या राजकीय क्षेत्रात कधी नव्हे ते प्रथमच घडल्या. यामध्ये कोट्यावधी रुपयांचे नुकसान तर झालेच शिवाय बीड जिल्ह्यावर एक प्रकारचा कलंक लागला. जिल्ह्यात राजकीय नेत्यांचे बंगले व कार्यालयांवर सुद्धा दगडफेक व जाळपोळ केली जाऊ शकते हे यातून दाखविण्यात आले. ही मोठी शरमेची व लाजिरवाणी बाब आहे. पोलीस प्रशासनाकडून आलेल्या आकडेवारीनुसार या सर्व घटनांमध्ये तब्बल ११ कोटी रुपयांचे आर्थिक नुकसान झाले.

# गेवराई तहसीलचा सावळा गोंधळ; ४ वर्षा पासून संचिका गायब




## शेतकऱ्याची हेळसांड – आत्महत्येशिवाय पर्याय नसल्याचा शेतकऱ्यांची भावना

**गेवराई । प्रतिनिधी**

**येथील तहसील कार्यालयातील शासकीय दस्तऐवजांमधील शेतकऱ्याच्या जमिनीच्या सातबारावरील ७ ब पंचनाम्याची संचिका गेल्या चार वर्षापासून तहसील कार्यातून गायब झाली ती देण्यास सर्व कर्मचाऱ्यांनी हात झटकले आहेत . संचिका तहसील कार्यालयात आढळून येत नसल्याचा रिपोर्ट दिला आहे .यामुळे शेतकरी हैराण झाला असून आता आत्महत्येशिवाय पर्याय नसल्याचे शेतकऱ्याने सांगितले .**

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, गेवराई तालुक्यातील खामगाव शिवारात गट नंबर ४१ मध्ये भाऊराव गंगाराम उनमुखे व सखाराम गंगाराम उनमुखे यांची १० एकर शेतजमीन आहे . या जमिनीची गट नं ४१ सात ब पंचनाम्याची संचिका मिळण्यासाठी शेतकरी भाऊराव गंगाराम उनमुखे यांनी २९ ऑगस्ट २०१९ रोजी तहसीलदार यांच्याकडे अर्ज दाखल केला होता . दोन वर्षांपूर्वी सदर शेतकरी भाऊराव उनमुखे मरण पावले .भाऊ मयत झाल्याने भावजय व पुतण्या यांच्याकडून सखाराम उनमुखे यांच्या नावे मुखत्यारपत्र केले आहे . वेळोवेळी अर्ज करूनही संचिका मिळाली नाही . दरम्यान सखाराम उनमखे यांनी या प्रकरणी तहसील कार्यालयाला तसेच खामगावचे तलाठी ,गेवराईचे मंडळ अधिकारी यांना वेळोवेळी अर्ज करून सदर पंचनामाची संचिका मागितली . परंतु त्यांना आजवर संचिका प्राप्त झालेली नसून तहसील कार्यालयाकडून या संदर्भात पत्र प्राप्त झाले आहे .यामध्ये जमाबंदी विभागात सदरील ७ ब भरणा केलेल्या संचिकेचा शोध घेतला असता सदर संचिका आढळून येत नाही . त्यामुळे मागणी केलेली पंचनाम्याची नक्कल देता येणार नाही तसेच संचिका प्राप्त होताच मागणी केलेली नक्कल देण्यात येईल, असे कळविले आहे. त्यानंतरही संचिका प्राप्त न झाल्याने सखाराम गंगाराम उनमुखे यांनी १२ एप्रिल २०२३ रोजी सदरची संचिका मिळण्यासाठी तहसील कार्यालयाकडे अर्ज केला होता . यासंदर्भात तहसील कार्यालय कोणतीही प्रतिक्रिया देत नाहीत . गेल्या चार वर्षांपूर्वीची संचिका का मिळत नाही ? अर्जदार यांनी पैसे न दिल्याने त्यांच्या संचिकेचा शोध घेतला जात नाही असा प्रश्न अर्जदार यांना पडला असून अर्जदार हे गरीब हालाखीच्या परिस्थितीत असल्याने पैसे देण्याची इच्छा नाही .तहसील कार्यालयातील संचिका गेल्या चार वर्षात सापडत नाही ही बाब गंभीर असून यावर पर्याय काढणे आवश्यक आहे .या निवेदनावर तहसीलदार काय निर्णय घेतील याची खूप काळापासून वाट पाहिली जात आहे . शेतकरी हवालदील आणि असाह्य झाल्याने पत्रकारांकडे धाव घेतली आहे .यावरून गेवराई तहसील कार्यालयामध्ये चाललेला सावळा गोंधळ उघड होत आहे . गरीब जनतेने कुणाकडे न्याय मागावा हे समजत देखील नाही . तर ४ वर्षापासून संचिका मिळत नाही . तहसीलदार यांनी लक्ष घालून शोध घ्यावा व यासारख्या अनेक संचिका गायब आहेत त्याचा शोध घेणे गरजेचे आहे .आता तहसीलदार याबाबतीत काय भूमिका घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे .याप्रकरणी अर्जदार सखाराम उनमुखे यांनी ४ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी बीड यांना निवेदन दिले असून या प्रकरणी आमरण उपोषण अथवा आत्महत्या करण्याचे हत्यार उपसावे लागेल, अशी भूमिका अर्जदार सखाराम गंगाराम उनमुखे यांनी घेतली आहे. जिल्हाधिकारी बीड यांनी या प्रकरणी लक्ष घालून प्रकरण निकाली काढावे अशी अपेक्षा आहे . या प्रकरणाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे .

# जिल्हा परिषद कन्या शाळेच्या प्रवेशद्वारासमोरच साचले पाणी

पैठण ।प्रतिनिधी

येथील जिल्हा परिषद कन्या शाळेच्या प्रवेशद्वारासमोरच बऱ्याच दिवसापासून नाल्याचे पाणी साचले आहे. एकाच ठिकाणी नाल्याचे पाणी साचत असल्याने या परिसरात दुर्गंधी पसरली असून त्यापासून शाळेतील विद्यार्थी आजारी पडत असून पालक वर्गात संतापाची भावना निर्माण झाली आहे. मुख्याध्यापक,शालेय व्यवस्थापन समिती तसेच पालकांनी अनेक वेळा तक्रार करूनही पैठण नगरपालिकेने दुर्लक्ष केले आहे. तसेच पोलीस स्टेशन पैठण येथील मोकळ्या जागेत घाणीचे साम्राज्य झाले असून या ठिकाणी सुद्धा दुर्गंधीयुक्त वातावरण झाले आहे. बाजूलाच छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसर असून या परिसरात नागरिकांची सतत वर्दळ असते. परंतू पोलीस स्टेशन पैठण समोरील मोकळ्या

### नगरपालिकेचे दुर्लक्ष, छावा क्रांतीवीर सेनेचे निवेदन

जागेत असलेल्या घाणीमुळे येथे उभे राहणे सुद्धा शक्य होत नाही. या दोन्हीही ठिकाणचे प्रश्न तात्काळ मार्गी लावावे अन्यथा सात दिवसानंतर छावा क्रांतीवीर सेना संघटनेमार्फत तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येणार आहे. असे आशयाचे निवेदन नगरपरिषद मुख्याधिकारी संतोष आगळे यांना देण्यात आलेले आहेत.

निवेदन देतेवेळी उपस्थित प्रदेश सरचिटणीस अनिल राऊत, मराठवाडा अध्यक्ष रामेश्वर बावणे, सचिव भगवान सोरमारे, युवा तालुकाध्यक्ष विशाल काळे, प्रतीक गावंडे आदी उपस्थित होते.

# कल्याण पंचायत समिती मध्ये आद्यक्रांतीकारक राघोजी भांगरे यांची जयंती साजरी!

कल्याण (संजय कांबळे)

इंग्रजाना सळो की पळो करून सोडणारा आणि जुलमी सावकारशाही विरोधात बंड पुकारणारा आद्यक्रांतीकारक राघोजी रामजी भांगरे यांची जयंती आज कल्याण पंचायत समितीच्या सभागृहात उत्साहाने पार पडली, ८ नोव्हेंबर १८०५च्या आसपास अकोले तालुक्यातील देवगाव या गावात राघोजी रामजी भांगरे यांचा जन्म झाला, जन्मपासूनच अन्यायाविरुद्ध लढण्याचे बाळकडू मिळाल्याने त्यांनी अकोले नगर जिल्ह्यातील इंग्रज व त्यांच्या आशिर्वादाने जुलूम करणा-या सावकारशाही विरोधक आक्रमक बंड सुरू केले, नगर, पुणे ठाणे आदी जिल्ह्यात त्यांनी इंग्रजांना सळो की पळो करून सोडले होते, कित्येक वर्षे त्यांचा हा लढा सुरू होता, त्यामुळे काहीही करून राघोजी भांगरे यांचा बंदोबस्त करावा असे इंग्रज अधिका-याना आदेश देण्यात आले होते,अखेर पंढरपूर येथे राघोजीला पकडण्यात इंग्रजी सत्तेला यश आले, पुढे त्यांना ठाणे कारागृहात २मे१८४८मध्ये फाशी देण्यात आली, व शहापूर तालुक्यातील उभंर ई या गावात त्यांच्या वर अंत्यसंस्कार करण्यात आले,

तेव्हापासून त्यांची जयंती मोठ्या प्रमाणात साजरी केली जाते, आज कल्याण पंचायत समितीच्या सभागृहात गटविकास अधिकारी अशोक भवारी यांच्या हस्ते आद्यक्रांतीकारक रोघोजी भांगरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला, तर इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनी फुले वाहून प्रतिमेचे दर्शन घेतले, यावेळी विस्तार विक्रम चव्हाण,कुंडलिक हरड, अनिस तडवी, संजना मुकणे पत्रकार संजय कांबळे, ग्रामविकास अधिकारी, व ग्रामसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते,(फोटो)



# गोळेगाव पुन्हा सिद्धेश्वर काळे यांचे सरकार

## गोळेगाव ग्रामपंचायतवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे वर्चस्व

जातेगाव । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील गोळेगाव येथे ग्रामपंचायत निवडणूक दुरंगी झाली यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सिद्धेश्वर भाऊसाहेब काळे यांचे एक पॅनल व शिवसेना भाजप यांचे एक पॅनल असे दुरंगी लढतीमध्ये माजी आमदार अमरसिंह पंडित साहेब यांचे समर्थक सिद्धेश्वर काळे हे दुसऱ्यांदा सरपंच म्हणून विजयी झाली असून नऊपैकी सहा सदस्य व सरपंच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने दणदणीत विजय मिळवल्याबद्दल सर्व स्तरातून कौतुक व अभिनंदन होत आहे

गेवराई तालुक्यातील गोळेगाव ग्रामपंचायत निवडणूकीत दुरंगी लढतीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे माजी आमदार अमरसिंह पंडित व माज जि प अध्यक्ष विजयसिंह राजे पंडित याच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सिद्धेश्वर भाऊसाहेब काळे सरपंच पदी निवड झाली आहे नवनिर्वाचित सरपंच सिद्धेश्वर काळे,व सदस्य रोहीदास सोमा चव्हाण, भाऊसाहेब नागोराव चव्हाण,ललिता सुदाम चव्हाण, गौतम माणीक खरात, अंजली अरुन काळे,उषा विक्रम काळे, विजयी झाल्याबद्दल माजी आमदार अमरसिंह पंडित व विजयसिंह राजे पंडित यांनी अभिनंदन कौतुक केले आहे



# शासनाचे नियम धाब्यावर बसऊन मोरेवाडी ग्रामपंचायत अंतर्गत

## नागमोडी नाली बांधणाऱ्या जिल्हा परिषद इंजिनियरचा सत्कार करणार– लोकजनशक्ती पार्टी

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील सर्वात मोठी तथा जास्त उत्पन्नाची मानली जाणारी ग्रामपंचायत म्हणजे मोरेवाडी या मोरेवाडी मध्ये जिल्हा परिषद अंतर्गत १४ लाख रुपये खर्चून नाली बनवण्यात आली आहे ती नाली इंजिनिअरच्या आशीर्वादाने नागमोडी नाली बनवल्यामुळे तेथील रहिवाशांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे नुकतेच वार्ड क्रमांक पाच मध्ये यशवंतराव चव्हाण चौक ते जाधव सर्विसिंग सेंटर इथपर्यंत आमदार फंडातून जवळपास ५ लाखाचे काम मंजूर करण्यात आले या कामामुळे ग्रामपंचायत मध्ये अंतर्गत दिस्पूस समोर आली या अंतर्गत वादामुळे ग्रामपंचायत सदस्याच्या घरा सहित जवळपास ५० घरांना अतिक्रमणाचा फटका



बसला आहे अक्षरशः या एरियातील १०० घरांचे कंपाउंड वॉल अशा चुकीच्या पद्धतीने काम करणाऱ्या इंजिनियर मुळे जनतेला बसत आहे अशा इंजिनियरची चौकशी करून त्यांना लवकरात लवकर सस्पेंड करण्यात यावे या आशयाचे निवेदन लोक जनशक्ती पार्टीचे अंबाजोगाई शहराध्यक्ष प्रदीप गुंडरे यांच्या नेतृत्वाखाली मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांना लोक जनशक्ती पार्टीच्या वतीने लवकरच देण्यात येणार आहे व या १४ लाखाच्या बोगस तथा नागमोडी नाली मुळे ज्यांच्या घरांचे कंपाउंड चे नुकसान झाले आहे ते नुकसान संबंधित जिल्हा परिषद इंजिनिअर यांच्या पगारीतून कपात करून संबंधित कुटुंबाला न्याय देण्यात यावा अशी मागणी करण्यात येणार आहे

# साधु संताचा आशीर्वाद घेऊन विवेक कजाकीस्तानला उच्च शिक्षणासाठी रवाणा

शिरुर कासार ।प्रतिनिधी

पाल्याच्या शिक्षणासाठी पालकांची धडपड पाहता आजच्या धकाधकीच्या परिस्थितीमध्ये ही धडपड काही ठिकाणी कुचकामी ठरल्याचे अनेक उदाहरणे पाहता येतील परंतु यातूनही काही चांगलेच फलित पाहायला मिळते अशीच घटना शिरूर कासार येथे शिरसाट कुटुंबियात घडली या त्यांच्या धावपळीचे कार्य सार्थक ठरविण्यासाठी मुलांने देखील चांगलेच कष्ट उपसले असल्याने आज त्याची एमबीबीएस ला वर्णी लागून तो साधू संतांच्या आशीर्वादाने व सर्वांच्या शुभेच्छा घेऊन कजागीस्तान तुर्कीस्तानला रवाना झाला आहे




शिरूर कासार येथील शिक्षक तथा कास्ट्राईब कल्याण कर्मचारी संघटनेचे बीड जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब शिरसाट व लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेब शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या संचालिका श्रीमती सुरेखा नानासाहेब पाखरे यांचे पुत्र विवेक बाळासाहेब शिरसाट हा उच्च शिक्षणासाठी ( एमबीबीएस )साठी त्याचा नंबर कजकिस्तान ( तुर्कीस्तान ) एशियन स्टेट मेडिकल युनिव्हर्सिटी येथे अभ्यासक्रमासाठी निवड झाल्याने त्याने काल श्रीक्षेत्र गहिनीनाथ गड येथे जाऊन प्रातःस्मरणीय संत वामनभाऊ महाराज यांचे दर्शन घेऊन संस्थानचे मठाधिपती ह भ प गुरुवर्य महंत विठ्ठल महाराज यांचे आशीर्वाद घेतले व त्याच्या विदेश दौऱ्यासाठी महाराजांसह अनेक ज्येष्ठ श्रेष्ठ व्यक्ती नातेवाईक आदींनी त्याला शुभेच्छा दिल्या

विवेक शिरसाट यास विदेश दौऱ्यासाठी पतसंस्थेचे माजी चेअरमन उद्धवराव मिसाळ साहेब दिलीप आणणा जायभाये सर्व शिक्षक शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी लोकनेते गोपीनाथराव मुंडे सहकारी शिक्षक संस्थेचे चे अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव सर्व संचालक सभासद मराठी पत्रकार संघटना संघटना आदींनी विवेक शिरसाठ याचे स्वागत करून पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत

# मौंजे धानोरा येथे अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ !

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील मौजे धानोरा येथे सालाबाद प्रमाणे याही वर्षी ह. भ. प. बाळू देव महाराज यांच्या ४६ व्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह व जगद्गुरु तुकाराम महाराज गाथा पारायण सोहळ्याचे दिनांक ८ नोव्हेंबर २०२३ ते १५ नोव्हेंबर २०२३ या कालावधीमध्ये आयोजन करण्यात आलेले आहे .



या अखंड हरिनाम सप्ताह मध्ये दैनंदिन कार्यक्रम पहाटे काकडा, पारायण गाथा, भजन ,हरिपाठ , हरी किर्तन व हरिजागर असे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे . आज बुधवार रोजी ह .भ. प . दिनेश माने महाराज, गुरुवार रोजी ह भ प सोनाली दीदी करपे महाराज, श्री हनुमान मंदिर व श्री संत बाळू देव महाराज मंदिराचे कलश पूजन शुक्रवार रोजी सकाळी १० वाजता महंत श्री सुनील गिरी महाराज यांच्या शुभहस्ते होनार आहे, शुक्रवार रोजी ह .भ. प .संजय महाराज भोसले ,शनिवार रोजी ह. भ. प . छगन महाराज खडके ,रविवार रोजी ह. भ. प .एकनाथ महाराज चतर शास्त्री ,सोमवार रोजी ह. भ .प. श्रावण महाराज जगताप , मंगळवार रोजी ह .भ .प .राजेश महाराज पाटील व बुधवार दिनांक १५नोव्हेंबर २०२३ रोजी ह. भ. प. अक्रूर महाराज साखरे यांचे सकाळी १०ते १२ या कालावधीमध्ये काल्याच्या कीर्तनाने सांगता होणार असून , आष्टी तालुक्यातील सर्व भाविक भक्तांनी मौजे धानोरा येथील प्रारंभ झालेल्या अखंड हरिनाम सप्ताहाचा लाभ घेऊन कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन मौजे धानोरा येथील बाळू देव महाराज सप्ताह कमिटी/ समस्त ग्रामस्थ/ बाळू देव महाराज भजनी मंडळ व सर्व तरुण मंडळ यांच्याकडून करण्यात आले आहे .

# ‘शाळा प्रवेश दिन’ महामानव मोफत शिकवणी वर्ग राजगृह बुध्द विहारात विविध उपक्रमाने संपन्न

बीड ।प्रतिनिधी

शिक्षणापासून वंचित असलेल्या आपल्या देशातील सर्वांच्या जीवनात शिक्षणरुपी प्रकाशाची वाट दाखविणारे ‘शिका’ या शब्दाने वाट दाखविणारे प्रज्ञासूर्य डॉ.भिमराव रामजी आंबेडकर यांचा भिवा रामजी आंबेडकर म्हणून गर्व्हमेंट हायस्कुल (सध्याचे छत्रपती प्रतापसिंह महाराज हायस्कुल) सातारा येथील इंग्रजी १ ली दि.७ नोव्हेंबर १९०० रोजीचा शाळा प्रवेश विद्यार्थ्यांना प्रेरणादायी आहे. त्या दिवसाची विद्यार्थ्यांनी व पालकांनी भिवाचे पालक सुभेदार रामजी यांची सतत आठवण ठेवावी असे उद्गार प्रा.डॉ.नामदेव शिनगारे यांनी केले. ‘वाचाल तर वाचाल’ फिरते मोफत वाचनालयातर्फे महामानव अभिवादन ग्रुप चालवित असलेल्या मोफत शिकवणी वर्ग राजगृह बुध्द विहार मोंढा रोड येथे शाळा प्रवेश दिन विद्यार्थी दिन म्हणून संपन्न कार्यक्रमास अध्यक्षपदी प्रा.डॉ.नामदेव शिनगारे लाभले होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.डॉ.संजयजी सावदे, ए.एल.औसरमल यांची व कॅप्टन राजाभाऊ आठवले व जी.एम.भोले सर यांची प्रमुख उपस्थिती होती.

सर्वप्रथम महामानवांना पुष्प, पुष्पमाला मान्यवरांच्या हस्ते अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डी.जी.वानखेडे यांनी केले तर सुत्रसंचलन डी.एम.राऊत यांनी केले. प्रा.डॉ.नामदेव शिनगारे पुढे म्हणाले की, क्रांतीसूर्य ज्योतीबा फुलेंनी विद्येचे महत्व जाणून जो उपदेश केला होता त्यानुसार डॉ.बाबासाहेबांनी जगातील विविध विद्यापीठात शिक्षण घेवून अनेक विषयात उच्च पदव्या मिळवूनही जीवनभर विद्यार्थीच आहोत असे समजून जीवन जगले. डॉ.बाबासाहेबांनी दिलेला बहुमोल उद्देश म्हणजे ‘प्रज्ञा–शील–करुणा’ चे महत्व प्रत्येक विद्यार्थ्यांनी व पालकांनी लक्ष्यात ठेवावे असे अनेक उदाहरणाद्वारे समजावून सांगितले. या प्रसंगी प्रा.डॉ.संजय सावदे यांनी शिक्षणाचे महत्व अत्यंत सोप्या भाषेत विद्यार्थ्यांना समजावून सांगितले व प्रत्येक पालकांनी कमीत कमी पदवी पर्यंत तरी आपल्या पाल्यांना शिक्षण दिलेच पाहिजे असे स्पष्ट केले.

विद्यार्थी दिनाचे ‘वाचाल तर वाचाल’ तर्फे औचित्य साधून वाचनालयातील जास्तीत जास्त पुस्तके वाचणारी नंदिनी धन्वे या विद्यार्थीनीला राष्ट्रमाता जिजाऊ, क्रांतीसूर्य ज्योतीबा फुले,, सावित्रीमाई फुले, छत्रपती शाहू महाराज, बडोदा नरेश सयाजीराव गायकवाड महाराज, ऐकावे बाबाचे अशी जीवन चरित्रे भेट देवून सत्कार करण्यात आला. तसेच राजगृह बुध्द विहारातील केंद्राला ३३ पुस्तकांचा संच विद्यार्थी, पालकांकरीता वितरित करण्यात आला. गुणवंत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य (वही–पेन) देवून सत्कार करण्यात आला तर प्रा.डॉ.नामदेव शिनगारे यांनी देखील प्रत्येक विद्यार्थ्याला शालेय साहित्य देवून पुढील शिक्षणाकरीता शुभेच्छा दिल्या. कार्यक्रम प्रसंगी प्रणव प्रधान व सोहम ससाणे यांनी ‘मला शिकून मोठं बनायचं, मला भिम बाबावांनी शिकायचं’ हे प्रेरणादायी गीत गाऊन सर्वांना मंत्रमुग्ध केले. मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.



कार्यक्रमास प्रा.डॉ.टंगलवाड, प्रा.ए.बी.जौंजाळ, बी.डी.तांगडे, शिक्षक रविंद्र टेकाळे, अपेक्षा घोडके, आशा वाघमारे, श्वेता धन्वे, आशा पवळ, ज्योती जावळे, लक्ष्मीबाई साबळे, कोणता धन्वे बहुसंख्य पालक व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आभार संघमित्रा वाघमारे यांनी मानले. खाऊ वाटप करुन सरणात्तयने कार्यक्रमाची सांगता झाली.




# गंगाभारती पतसंस्थेला तीन ते चार महिन्यापासून टाळ...!

लिंबागणेश । हरिओम क्षिरसागर

बीड तालुक्यातील करचोंडी येथील बिगर शेती पतसंस्थेची लिंबागणेश येथे गंगाभारती पतसंस्था असुन सदर शाखा हि पाच ते सहा महिन्यांपासून ठेवीदारांच्या ठेवी देण्यास टाळाटाळ करत असुन सदरिल पतसंस्था ज्या जागेत आहे. त्या जागेची देखील एक वर्षापासून भाडे थकलेले असुन आता कुलुप देखील लावलेले आहे . त्यामुळे ठेवीदारात अतिशय संताप व्यक्त होत असून संस्थेतील अडलेले पैसे कोणाला मागावे? हा देखील ठेवीदारांना पडलेला प्रश्न आहे. मात्र कर्मचारी नुसते आश्वासन देतात की आज उद्या पैसे मिळून जातील. मात्र आता ऐन दिवाळी सणाच्या तोंडावर ठेवीदारांना आर्थिक खर्चाचा भार पडलेला आहे. लिंबागणेश शाखा व्यवस्थापक संतोष सवासे यांना काही ठेवीदारांनी संपर्क साधायचा प्रयत्न केला असता ते म्हणातात की आम्ही कर्जदाराचे वायदे देऊ. मात्र ठेवीदारांनी त्यांचे पैसे हे दुसरी न कडे ठेवता या बँकेत काही टक्के जास्त व्याजदरामूळे पैसे टाकलेले असतात. मात्र आता शाखेला कुलुप असल्याने ठेवीदारांची गोची झालेली दिसून येत आहे.



# सुनिल तौर यांचा टाकरवन ग्रामपंचायत निवडनुकित विजय

टाकरवन ।प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यतिल टाकरवन ग्रामपंचायत ही सर्वात मोठी ग्रामपंचायत आहे . रविवार निवडनुक प्रक्रिया पार पडली . सोमवारी निकाल जाहिर झाले .सरपंच पदासह १६ जागेसाठी ४८ उमेदवार रिंगनात होते. तिरंगी लडती मध्य सुनिल तौर यांचा विजय झाला. मागिल पंचवर्षिक मध्य सुनिल तौर यांच्या पत्नी शुभांगी सुनिल तौर यांच्या कार्यकाळात गावात मोट्या प्रमाणात विकास कामे झाली

याची पोहच पावती म्हणून टाकरवनच्या मतदारानी सुनिल तौर याना निवडून देऊन गावविकासासाठी दुस्र्यांदा संधि दिली आहे. टाकरवन ग्रामपंचायत निवडनुकी साठी तिरंग लडत झाली. सरपंच पदासाठी ३ तर सदस्य पदासाठी ४५ उमेदवार रिंगनात उभे होते. सुनिल तौर यांच्या सरपंचपदासाठी १५२६ मतानेविजय झाला. विजया नंतर गावातुन विजय मिरवनुक कढन्यात आली. मा. आमरसिंह पंडित मा. विजयसिंह पंडित मा. प्रकाश सोळंके यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टीच्या सुनिल तौर यांची टाकरवनच्या सरपंचपदी वर्णी लागली. निवडी नंतर सुनिल तौर यांनी मतदारांचे आभार मानले. आदर्श ग्रामविकास पॅनलचे सरपंच पदाचे सुनिल तौर याना १५२६ मते मिळाली, परिवर्तन ग्रामविकास पॅनलचे गणेश लव्हाळे १४२७ मते मिळाली, युवा ग्रामविकास परिवर्तन पॅनलचे फूलचंद वराट ८२९ मते मिळाली सदस्य पदाच्या ४५ उमेदवारा पैकी आदर्श ग्रामविकास पॅनलचे ३, परिवर्तन ग्रामविकास पॅनलचे ९, युवा ग्रामविकास परिवर्तन पॅनलचे ३ उमेदवार विजयी झाले आहेत. नवनिर्वाचित उमेदवार सरपंचपदी सुनिल तौर तर सदस्यपदि जनार्धन आडागळे, लक्ष्मण गारड, गजानन कनाडे, पंढरीनाथ भुंबे,डॉ. अंगद गायकवाड , इनामदार प्रवीन, दयानंद गोबर, शोभा काजाळे, स्वाती सातपुते, अशोक खुळे, दादासाहेब पट्टेकर, विद्या आडागळे, जगन्नाथ मानकर, किसनाबाई चव्हाण, अयोध्या सूपेकर यांचा नवनिर्वाचक पदी विजय झाला आहे

# दिवाळीची मनसोक्त खरेदी अन् विक्री; ज्वेलरीपासून ते साड्यांपर्यंत एकाच छताखाली सोय

## बीडच्या तेजस्वीनी ग्रुपने भरवले प्रदर्शन : बीडसह सोलापूर, छत्रपती संभाजीनगरहून आल्या महिला उद्योजक

बीड ।प्रतिनिधी

येथील तेजस्वीनी ग्रुपच्या माध्यमातून संचालिका सोनल अरविंदसिंह पाटील यांनीमहिला उद्योजकांसाठी दुसऱ्यांदा मोठे व्यासपिठ उभारून दिले. रविवारी बीड शहरातील रामकृष्ण लॉन्सवर भव्य प्रदर्शन भरविण्यात आले. दिवाळीच्या अनुषंगाने येथे अगदी ज्वेलरीपासून ते फराळ, साड्यापर्यंत सर्व एकाच छताखाली उपलब्ध करून दिले होते. त्यामुळे बीडमधील महिलांनीही मनसोक्त खरेदी व विक्री केली. या प्रदर्शनात केवळ बीडच नव्हे तर सोलापूर, छत्रपती संभाजीनगर आदी जिल्ह्यांतील महिला उद्योजकांनी सहभाग नोंदविला होता.

काही दिवसांपूर्वीच सोनल अरविंदसिंह पाटील यांनी तेजस्वीन ग्रुपची स्थापना केली. सोशल मिडीया व भेटी-गाठीच्या माध्यमातून हजारो महिला उद्योजक जोडल्या. त्यांच्याशी संवाद साधून त्यांच्यासाठी भव्य प्रदर्शन भरविले. यापूर्वीही बीडमध्ये असे प्रदर्शन भरविले होते. यातही मराठवाड्यातील महिला उद्योजकांनी सहभाग नोंदविला. हा प्रतिसाद पाहून दिवाळीच्या अनुषंगाने बीड शहरातील महिला उद्योजकांसह खरेदी करणाऱ्यांसाठी एकाच छताखाली सर्व सुविधा



उपलब्ध करून दिल्या. सकाळी ९ ते रात्री १० वाजेपर्यंत खरेदी व विक्री जोरात सुरू होती. हजारो महिलांनी या प्रदर्शनाला भेट देत खरेदी केली. सोनल पाटील यांच्या संकल्पनेतून भरविलेल्या प्रदर्शनाचे सर्वस्तरातून स्वागत होत आहे.

दरम्यान दिवसभरात या प्रदर्शनाला माजी नगराध्यक्षा डॉ.दीपा क्षीरसागर, आशाताई वरपे, राणा चव्हाण, सोमनाथ खताळ, नितीन राजपूत, शेख रब्बानी राज, अखिल बुंदेले, विनोद चव्हाण, जयश्री मुंडे, जया विधाते आदींनी भेटी दिल्या. यावेळी तेजस्वीनी ग्रुपच्यावतीने सोनल पाटील व अरविंद पाटील यांनी मान्यवरांचे स्वागत केले. मान्यवरांनीही प्रदर्शनाचा प्रतिसाद पाहून सोनल पाटील यांचे कौतुक केले.

### मनाला समाधान वाटते...

महिला उद्योजकांना एकत्र करून प्रदर्शन भरविण्याची संकल्पना डोक्यात आली. त्यादृष्टीने नियोजन केले. महिलांपुढे ही संकल्पना मांडताच सर्वांनी होकार दिला. पहिल्या प्रदर्शानानंतर दुसऱ्यालाही प्रचंड प्रतिसाद मिळाला. रात्री उशिरापर्यंत खरेदी, विक्री सुरूच होती. बीड जिल्हाच नव्हे तर मराठवाडा, सोलापूर जिल्ह्यातील महिला उद्योजिकांनी यात सहभाग नोंदविला होता. महिलांसाठी सुरू केलेला तेजस्वीनी ग्रुप उत्स्फूर्त प्रतिसादामुळे उजळून निघाला आहे. त्यामुळे मनाला समाधान वाटत असल्याची प्रतिक्रिया तेजस्विनी ग्रुपच्या संचालिका सोनल अरविंदसिंह पाटील यांनी व्यक्त केली.

# अपघातातून थोडक्यात बचावले गृहमंत्री!अमित शहा यांचा ताफा वीजांच्या तारांना धडकला

राजस्थान येथे निवडणूक प्रचाराच्या दौऱ्यावर असतांना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा थोडक्यात बचावले. अमित शहा हे राजस्थानच्या परबतसर (नागौर) येथे सभेला जात होते. यावेळी त्यांचा रथ हा एका विजेच्या खांबाला जाऊन धडकला. यामुळे ठिणग्या उडून तारा लोंबकळायला लागल्या. यानंतर रथ थांबवण्यात आला. दरम्यान, या घटनेमुळे पोलिसांची तारांबळ उडाली. पोलिसांनी अमित शहा यांना दुसऱ्या कार मधून सभेच्या ठिकाणी सुरक्षित पाठवण्यात आले. या घटनेमुळे त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. सुदैवाने या घटनेत कुणीही जखमी झाले नाही. ही घटना मंगळवारी संध्याकाळी ४.२० च्या सुमारास घडली.



राजस्थान येथे सध्या विधानसभेची धामधूम सुरू आहे. या ठिकाणी भाजप आणि कॉंग्रेसमध्ये अतितटीची लढत आहे. निवडणुकीसाठी प्रचारसभा सुरू असून भाजप आणि कॉंग्रेस दोन्ही पक्ष विजयासाठी जोर लावत आहेत. राजस्थानच्या परबतसर (नागौर) येथे अमित शहा यांची सभा होणार होती. त्या आधी बिडियाड गावातून त्यांची छोटी सभा झाली. या ठिकाणी त्यांनी गहलोत यांच्यावर वीज प्रश्नी हल्ला देखील चढवला होता. ही सभा संपवून अमित शहा हे परबतसरच्या गणेश मंदिरात असलेल्या सभेच्या ठिकाणी जाण्यासाठी निघाले.

त्यांचा रथ रस्त्याने जात असतांना डंकोली लोकलमध्ये रथाचा वरचा भाग विजेच्या तारेला धडकला. यामुळे या तारा तुटून थेट खाली लोंबकळत होत्या. यावेळी मोठ्या ठिणग्या देखील उडाल्या होत्या. यानंतर रथ थांबवण्यात आला. या घटनेमुळे पोलिसांची तारांबळ उडाली.



गेवराई तालुक्यातील अति चर्चीत असलेली नंदपुर कांवी ग्रामपंचायतीवर शिव सेनेचा भगवा फडकला. माजी. उपसभापती शेख मिनाहाज यांच्या शिवछत्र ग्रामविकास पॅनेलचा दारुण पराभव

# बांधकाम कामगारांची मध्यान्ह भोजन योजना बंद करण्याचा शासन निर्णय म्हणजे रोगापेक्षा ईलाज भयंकर:- डॉ.गणेश ढवळे

बीड ।प्रतिनिधी

बांधकाम मजुरांना दुपारच्या जेवणाची सोय करुन देणारी आवश्यक मध्यान्ह भोजन योजना सरकारने अनियमितता व अपहार होत असल्याचे कारण दाखवत १ नोव्हेंबर पासून बंद केली असुन यामुळे कामगारांच्या उपासमारीचा प्रश्न निर्माण झाला असुन तातडीने हि योजना पुर्ववत सुरू करण्यात यावी अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हाधिकारी, जिल्हा कामगार अधिकारी बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, प्रधान सचिव, कामगार मंत्री सुरेश खाडे, सचिव कामगार मंत्रालय विभाग यांना केली असुन सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलनाचा ईशारा दिला आहे.



महाराष्ट्र सरकारने राज्यातील बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजनासाठी राज्य शासनाने ३० आगस्ट २०२१ पासून मुंबईसह राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये योजना सुरू केली होती.या योजनेंतर्गत चइजउथथइ मध्ये नोंदणी केलेल्या कामगारांना १ रुपयात मध्यान्ह भोजन योजनेत जेवणामध्ये चपाती,भाजी,दाळ,भात, कोशिंबीर,गुळ यांचा समावेश होता. यासाठी जळगाव, ठाणे पालघर, नाशिक,रायगड, अहमदनगर याठिकाणी भोजन पुरवण्यासाठी मे.इंडो अलाईड प्रोटीन फुड्स प्रा.लि.या कंपनीसोबत शासनाने करार केला होता.योजनेच्या अंमलबजावणी दरम्यान करारनाम्यातील अटी व शर्तींच्या उल्लंघनामुळे संबंधित प्रकरणात कारवाई करून सुधारणा करण्याऐवजी सरकारकडुन दि.१ नोव्हेंबर २०२३ पासुन महाराष्ट्र इमारत आणि इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने बांधकाम कामगारांना दुपारच्या जेवणाची सोय करून देणारी मध्यान्ह भोजन योजना बंद करण्याचा निर्णय घेतला असुन त्यामुळे कामगारांची उपासमार होत असुन या योजनेमुळे कामगारांची होणारी आर्थिक पाहता यास चांगला प्रतिसाद मिळत होता.मात्र ईतर जिल्ह्यात या योजनेत अपहार झाल्याचे निदर्शनास आल्याने अपहार करणारांवर कारवाई करण्याऐवजी योजनाच बंद करण्याचा शासन निर्णय अन्यायकारक असुन यामुळे बांधकाम कामगारांमध्ये तिव्र नाराजी आहे. त्यामुळे पुन्हा ही योजना सुरू करण्यात यावी अशी मागणी केली आहे.

मध्यान्ह भोजन योजना बंद करण्याचा तुघलकी निर्णय घेत बांधकाम कामगारांच्या उपासमारीचा प्रश्न निर्माण करणा-या योजनेंतर्गत अनियमितता व अपहार प्रकरणी कारवाई करण्याऐवजी योजनाच बंद करण्याच्या शासनाच्या निर्णयाचा निषेध करण्यासाठी ऐन दिवाळीत सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी ठेचा भाकर आंदोलनकरण्यात येणार आहे.

छत्रपती संभाजीनगर हे ऐतेहासिक शहर असून पर्यटन नगरी आहे. डॉ. भागवत कराड केंद्रीय राज्य अर्थमंत्री यांनी धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांच्या प्रवचनाचा कार्यक्रम दि.६, ७, व ८ नोव्हेंबर २०२३ रोजी छत्रपती संभाजी नगर अयोध्या नगरी मैदान येथे आयोजित केलेला आहे. केंद्रीय राज्य मंत्री हे त्या कार्यक्रमाचे आयोजक तसेच निमंत्रक आहेत. त्यांनी धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांच्या स्वागता साठी मागील २० दिवसापासून शहरात ठीक ठिकाणी अनधिकृत बॅनर्स/ होर्डिंगस / पोस्टर कुठलीही परवानगी न घेता लावून शहराचे विद्रुपीकरण केलेले आहे. सदरील बॅनर्स/ होर्डिंगस / पोस्टर हे झाडावर, लाईट च्या पोलवर,उड्डाणपूलावर,ऐतिहासिक ठिकाणाजवळ, महत्वपुर्ण चौकात, सार्वजनिक ठिकाणी लावून शहराचे विद्रुपीकरण केले आहे. या प्रकारचे कृत्य हे चरहरीरीहींीर ििशींिशपींळेप ष ऊशषरलशाशपीं -लीं च्या ेशिल.३ व खपवळरप झशपरश्र उेवश च्या कलम २६८ नुसार दखलपात्र गुन्हा असून सदरील कृत्या मुळे सामान्य नागरिकांना वाहतुकीस अडथळा मागील २० दिवसा पासून होत आहे. तसेच सदरील बॅनर / पोस्टर / होल्डींग्स हे धोक्याच्या ठिकाणी लावल्यामुळे अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. तसेच त्यामुळे सर्वसामान्य नागारीकाच्या जिवीतास धोका पोहचू शकतो. त्यामुळे याची दखल घेऊन ॲड. ईश्वर नरोडे पाटील यांनी दिनांक २३/१०/२०२३ रोजी आयुक्त महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर यांना तक्रारी अर्ज देवून सदरील अनाधिकृत बॅनर्स/ पोस्टर / होल्डींग्स तात्काळ काढून घेण्याची तसेच आयोजकावरती कायदेशीर कार्यवाही करण्याची विनंती केली होती. सदरील तक्रारीवर आयुक्त महानगरपालिका यांनी कसलीही दखल न घेतल्यामुळे अँड. ईश्वर नरोडे पाटील यांनी ॲड. महेंद्र पंडीतराव गंडले यांच्या मार्फत उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे याचिका दाखल केली असून याचिकेत केंद्रीय राज्य मंत्र्यांना प्रतिवादी केले आहे. केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांनी ऐतेहासीक शहराचे विद्रुपीकरण केल्यामुळे तसेच बॅनर्स/ पोस्टर / होल्डींग्स लावून सर्वसामान्य नागरीकास वेठीस धरल्यामुळे अनाधिकृत बॅनर्स/ पोस्टर होल्डींग्स तात्काळ काढण्याची तसेच आयोजकावरती कायदेशीर कार्यवाही करण्याची मागणी याचिकेत केली आहे. ॲड. ईश्वर नरोडे पाटील यांच्यावतीने अँड महेंद्र पंडीतराव गंडले हे काम पाहत असून त्यांना ॲड. सोमेश्वर मुंडीक, ॲड. सिद्धार्थ पाईकराव ॲड. अनिल वरठे हे सहकार्य करीत आहेत.



मार्फत अँड. ईश्वर नरोडे पाटील



# बीड जिल्ह्यात दुष्काळाची भयाण दाहकता

## नदी- तलाव कोरडेठाक, पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर

गेवराई । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात यंदा पावसाने पाठ फिरवली होती. अपेक्षित पाऊस न पडल्यामुळे जिल्ह्यात आतापासून दुष्काळाची दाहकता जाणवायला लागली आहे. बीड जिल्ह्यातून वाहत असलेल्या नद्या तसेच तलाव कोरडे पडले आहेत. यामुळे आल्यापासूनच पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होऊ लागला आहे. बीड जिल्ह्यात दुष्काळाची दाहकता भयान होत चालली आहे. जिल्ह्यातील नदी, तलाव कोरडे ठाक पडले असून पिण्याच्या पाण्यासह चाऱ्याचा प्रश्न देखील गंभीर बनला आहे. तर माजलगाव तालुक्यासह बीड शहराला पाणीपुरवठा करणारे माजलगाव धरण देखील अवघ्या १० टक्क्यांवर आहे. नदी, तलावात पाणी नसल्याने विहीर व ट्यूबवेलचे पाण्याचे जहीर देखील कमी होण्याची शक्यता आहे. यामुळे येणाऱ्या काही दिवसांमध्ये बीड शहराला देखील पिण्याच्या पाण्याच्या संकटाचा सामना करावा लागणार आहे. उन्हाळ्यात ही समस्या अधिक बिकट होण्याचे चिन्ह आहे.

दुष्काळ सदृश्य चित्र असताना सरकार अन शासनाने बीड जिल्ह्यातील अकरापैकी अवघ्या ३ तालुक्यातच दुष्काळ जाहीर केल्याने शेतकऱ्यांसह सर्वसामान्य नागरिक देखील मोठ्या संकटात सापडले आहेत. यामुळे जिल्ह्यातील सर्व तालुक्यात दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी केली जात आहे.

# धूर फवारणीकडे नगरपरिषद प्रशासनाचे मात्र दुर्लक्षः सरपते

बीड ।प्रतिनिधी

डासामुळे बीड शहरातील डेंगू सदृश्य रुग्ण आढळत आहेत साथीचे रोगाला नियंत्रण करण्यासाठी बीड शहरात डास प्रतिबंधक धूर फवारणी करावी,असे निवेदन सामाजिक तथा सदस्य वंचित बहुजन आघाडी बीड शहर मिलिंद सरपते यानी मुख्याधिकारी नगरपरिषद बीड यांना दिले, निवेदनात पुढे म्हटले आहे की,बीड शहरातील वार्डासह, विविध ठिकाणी गेल्या काही दिवसापासून नाल्या अस्वच्छ असल्यामुळे डेंगू सदृश्य रुग्ण आढळत आहेत. शहरातील विविध भागात डासांचा प्रदुर्भाव जास्त वाढला आहे. ही बाब आजार पसरविण्यास कारणीभूत ठरत आहे. त्यामुळे साथीचे रोग सर्दी, खोकला, ताप यासारखे आजार सर्वसामान्यांना होत आहेत. याकडे प्रशासन मात्र बघ्याच्या भूमिकेत दिसत आहे. खबरदारीची उपाययोजना म्हणून डास प्रतिबंधक धूर फवारणी करणे आवश्यक आहे. मात्र त्याकडे



नगरपरिषद प्रशासनाचे दुर्लक्ष झाले आहे.

तरी मा. मुख्याधिकारी निता अंधारे यांनी बीड शहरातील वार्डासह, विविध ठिकाणी डास प्रतिबंधक दूर फवारणी करून मानवी जीवितास हानिकारक असणारे डासांची उपाययोजना तात्काळ करावी अशी मागणी सामाजिक तथा सदस्य वंचित बहुजन आघाडी बीड शहर मिलिंद सरपते यांनी केलेल्या निवेदनात केली आहे.

# चौसाळा - घारगाव रस्त्याच्या दुरुस्तीसाठी आज प्रत्यक्षात लागला मुहूर्त...

**लिंबागणेश।हरिओम क्षिरसागर**

**बीड जिल्हयातील असणारे चौसाळा हे गाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे गाव असून काही अंतरावरच घारगावं म्हणून एक गाव आहे. त्या गावातील लोक आपली उपजीविका भागवण्यासाठी चौसाळ्याला येत असतात मात्र घारगाव ते चौसाळा हा रस्ता अत्यंत खराब असल्याकारणाने ग्रामस्थांची जास्तीची गैरसोय होत होती.**




मात्र आता त्या रस्त्याच्या दुरुस्तीकरणाला प्रत्यक्षात सुरुवात झाल्याने ग्रामस्थांमध्ये तसेच रस्त्यावरून येणाऱ्या जाणाऱ्याची गैरसोय होणार नाही .

# काश्मीर खोऱ्यामध्ये दुमदुमला छत्रपतींचा जयघोष

मुंबई : काश्मिरमधील कुपवाडा येथील भारत-पाक नियंत्रण रेषेजवळ उभारण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा देशाचे रक्षण करणाऱ्या सैनिकांना प्रेरणादायी, उर्जादायी ठरेल, असे सांगतानाच छत्रपतींचा हा पुतळा आपल्या देशाचा तिरंगा ध्वज शत्रूच्या छातीवर फडकवण्यासाठी नेहमीच जवानांना प्रेरणा देईल. त्यांचे मनोबल उंचावत राहील, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज कुपवाडा येथे व्यक्त केला. पुतळा अनावरणाच्या निमित्ताने काश्मीर खोऱ्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा जयघोष दुमदुमला.

आम्ही पुणेकर संस्था, ४१ राष्ट्रीय रायफल मराठा बटालियन यांच्या माध्यमातून कुपवाडा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा बसविण्यात आला आहे. त्याचे अनावरण आज महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी जम्मू काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा, महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार, महाराष्ट्र राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर, आम्ही पुणेकर संस्थेचे विश्वस्त अभयसिंह शिरोळे, हेमंत जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. मुख्यमंत्र्यांनी भाषणाची सुरूवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयघोषाने केली. समोरच्या पर्वतरांगापलिकडे असलेल्या पाकिस्तामनध्ये हा जयघोष पोहोचला पाहिजे, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.

मुख्यमंत्री श्री. शिंदे यावेळी म्हणाले, अश्वारुढ पुतळ्यावरील छत्रपती शिवाजी महाराज पाकिस्तानच्या दिशेने बघत आहेत. त्यांच्या हातात तलवार आहे. महाराज येथे असल्याने शत्रू येथे पाऊल ठेवण्यास धजावणार नाही. हा पुतळा पाहून दहशतवादीही काश्मीरमध्ये घुसखोरी करण्याची हिंमत करणार नाही. ज्या ठिकाणी हा पुतळा बसवला आहे त्या ठिकाणी काही दिवसांपूर्वी मोठा खड्डा पडला होता. तेव्हा जवानांनी सुमारे १८०० ट्रक माती भरून त्याठिकाणी पुतळ्यासाठी भक्कम पाया करण्यात आला. याचा उल्लेख करून मुख्यमंत्र्यांनी मराठा बटालियनच्या जवानांचे कौतुक केले. सातारा येथील मेजर संतोष महाडीक यांना अभिवादन करीत त्यांच्या बलिदानाची आठवण यावेळी त्यांनी सांगितली.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला ३५० वर्ष पूर्ण झाली. त्यानिमित्त राज्य शासन आणि सांस्कृतिक विभागाने विविध उपक्रम राबवले. याच कालावधीत कुपवाड्यात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्यात आला याला मोठे महत्व आहे. याठिकाणी स्मारक करण्यात येत आहे. त्यासाठी आवश्यक ते सहकार्य राज्य शासन करेल, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली. छत्रपती शिवाजी महाराजांची वाघनखे भारतात आणण्याचा करार करण्यात आला असून ही अभिमानाची बाब आहे. वाघनखे राज्यात आणल्यानंतर ठिकठिकाणी दर्शनासाठी ठेवली जातील, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काश्मीरमधील कलम ३७० हटवण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. त्यानंतर आता काश्मीरच्या विकासाचा नवा अध्याय सुरू झाला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या मार्गदर्शनाखाली नायब राज्यपाल श्री. सिन्हा यांनी गेल्या महिन्यात काश्मिर येथे जी २० परिषद घेतली, असेही मुख्यमंत्री श्री. शिंदे यावेळी म्हणाले. कुपवाडा येथे असलेले हे स्मारक जम्मू-काश्मीरला भेट देणाऱ्या देशातील लोकांसाठी एक प्रेरणास्थान बनेल. आपल्या सर्वांसाठी प्रेरणास्रोत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसवण्यात आला आहे. हे स्मारक महाराष्ट्र आणि काश्मीरमधील संबंध अधिक दृढ करण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पुजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरूवात राष्ट्रगीताने झाली. यावेळी संस्थेचे विश्वस्त श्री. शिरोळे, मेजर जनरल गिरीष कालिया यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी मराठा बटालियनचे जवान, लष्करी अधिकारी आदी उपस्थित होते.

## आता दरवर्षी कुपवाडा येथे शिवाजी महाराज पर्व- नायब राज्यपाल मनोज सिन्हा

आज कुपवाडा येथे नव्या परंपरेला सुरूवात झाली असून यापुढे प्रत्येक वर्षी कुपवाडा येथे ७ नोव्हेंबरला शिवाजी महाराज पर्व साजरे करण्यात यावे, असे आवाहन नायब राज्यपाल श्री. सिन्हा यांनी जवानांना केले. 'स्वत:वर विश्वास ठेवा, मी नेहमी तुमच्या सोबत असेन' शिवाजी महाराजांनी शुरविरांना दिलेला हा संदेश मराठीतून वाचत श्री. सिन्हा यांनी विविध इतिहासकार आणि कवींनी लिहिलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रम गाथांना उजाळा दिला.

## शिवाजी महाराजांचे विचार दिशादर्शक- मंत्री सुधीर मुनगंटीवार

छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावातच शक्ती आहे. उर्जा आहे, असे सांस्कृतिक कार्यमंत्री श्री. मुनगंटीवार यांनी यावेळी सांगितले. दैनंदिन जिवनातील प्रत्येक समस्येवर मार्ग दाखविण्यासाठी शिवाजी महाराजांचे विचार दिशादर्शक असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. छत्रपती शिवाजी महाराजांची वाघनखे भारतात आणण्यासाठी लंडनमध्ये करार करण्यात आला. राज्यासाठी ही अभिमानाची बाब असल्याचे मंत्री श्री. मुनगंटीवार यांनी सांगितले.



## मुख्यमंत्र्यांनी साजरी केली जवानांसोबत दिवाळी

दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर पुतळा अनावरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या ठिकाणी मराठा बटालियन असल्याने मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी जवानांसोबत दिवाळी साजरी करण्याचा आनंद घेतला. त्यांच्यासोबत फराळाचा आस्वाद घेत मुख्यमंत्र्यांनी जवानांना आणि त्यांच्या कुटुंबियांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. तुम्ही रात्रं दिवस सीमेवर प्राणपणाने बाजी लावून देशाचे रक्षण करतात. त्यामुळे आम्ही सर्व सण उत्सव आनंदाने साजरे करू शकतो, अशा शब्दांत मुख्यमंत्र्यांनी जवानांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

# महिलांच्या शरीरात असे काय वेगळे असते की ज्यामुळे त्यांना दाढी आणि मिशी येत नाही?

मनुष्य जीव हा इतर प्राण्यांच्या तुलनेत विशेष आहे. त्यांच्याकडे विचार करण्याची क्षमता आहे,समजण्याची ताकद आहे. तसेच कोणत्याही विषयावर आपले मत मांडण्याचे स्वातंत्र्य आहे. हे गुण प्रत्येक मनुष्यामध्ये असतात. मात्र देवाने महिला आणि पुरुषांच्या शरीरात असे काही बदल केले आहेत जे दोघांमध्ये वेगवेगळे आहेत. तुमच्या डोक्यात आता असा सवाल आला असेल की जसे पुरुषांच्या चेहऱ्यावर दाढी असते तसे महिलांना का नसते. महिलाही एक माणूस आहे मग त्यांना मिशी का येत नाही जाणून घेऊया

काय आहे कारण?

पुरुषांमध्ये डाय हायड्रोटेस्टोस्टीरॉन नावाचे एन्झाईम असते ज्यामुळे त्यांचे हेअर फॉलिकल उत्तेजित होतात आणि त्यांना दाढी येते. महिलांमध्ये हे एन्झाईम आढळत नाही. महिलांच्या यौन ग्रंथी एस्ट्रोजन नावाचे हार्मोन निर्माण करतात. एस्ट्रोजनमुळे मुलींच्या शरीरात बदल होतात. त्यानंतर ती मुलगी किशोरावस्थेमध्ये प्रवेश करते. महिलांमध्ये सेक्स हार्मोन पुरुष हार्मोनच्या उलट काम करतात. महिलांच्या शरीरात मेल हार्मोन वाढल्यास अथवा फीमेल हार्मोन कमी झाल्यास दोन्ही हार्मोनमधील बॅलन्स बिघडतो. या कारणामुळे नको त्या जागेवर केस उगवतात.



## पुरुषांमध्येही दिसतात बदल

पॉलीसिस्टिक ओवरी सिंड्रोम,पॉलिसिस्टिक ओव्हरियन डिसीज आणि हार्मोनल असंतुलन अशी काही कारणे आहेत ज्यामुळे महिलांना केस येत नाही. तसेच एंड्रोजन नावाचे हार्मोन पुरुषांमध्ये दाढी-मिशी येण्याचे कारण बनतात. यामुळे शरीरात काही बदल होतात.


# चकलांबा सरपंचपदी सौ प्रियंका शिवप्रसाद खेडकर विजयी
## श्री रोकडेश्वर पॅनलचे सर्व १३ उमेदवार बहुमतांनी विजयी

बीड ।प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील चकलांबा येथील ग्रामपंचायत निवडणूकीत श्री रोकडेश्वर पॅनलला ऐतिहासिक विजय झाला आहे. पॅनलच्या सरपंच पदासाठीच्या उमेदवार सौ प्रियंका शिवप्रसाद खेडकर यांनी एकूण २७०९ मिळाली. सौ प्रियंका खेडकर यांचा १९५० मतांनी एकतर्फी विजय झाला. या पॅनलचे १३ पैकी १३ उमेदवार प्रचंड बहुमताने विजयी झाले. गेवराई तालुक्यातील चकलांबा ग्रामपंचायतीच्या निवडणुकीसाठी रविवार दि. ५ नोव्हेंबर २०२३ रोजी मतदान झाले. दि. ६ ऑक्टोबर रोजी मतमोजणी झाली यामध्ये श्री रोकडेश्वर पॅनलच्या सौ.प्रियंका शिवप्रसाद खेडकर यांनी अपेक्षेप्रमाणे मोठा विजय प्राप्त केला. सुरुवाती पासूनच सदर ग्रामपंचायतची निवडणूक ही एकतर्फी होणार हे दिसून येत होते. निवडणुकीत या पॅनलचे सर्वच्या सर्व १३ उमेदवार आणि सरपंच पदाच्या उमेदवार मोठया फरकाने विजयी झाले. सौ. प्रियंका खेडकर यांना एकूण २७०९ मते मिळाली त्या १९२९ मते घेऊन मोठ्या फरकाने विजयी झाल्या आहेत.

सदस्यपदी निवडून आलेले उमेदवार आणि मिळालेली मते पुढीलप्रमाणे आहेत. वार्ड क्रमांक १ मधून छाजेड आणि अमोलचंद (५११), सौ साळवे लक्ष्मी सोमनाथ आणि सौ. गुंजाळ जया कुंडलिक (५७८), वार्ड क्रमांक २ मधून गाडे गणेश दादाराव (५६२) आणि खेडकर पुष्पा बाळू (४३५), वार्ड क्रमांक ३ मधून खेडकर आदिनाथ अर्जुन (५४५), नागरे ज्ञानेश्वर शहादेव (५९८) आणि सौ. खेडकर गयाबाई बाळासाहेब (७१०), वार्ड क्रमांक ४ मधून पठाण इस्माईल रमजान (३५२), सौ. साळवे आशाबाई नवनाथ (३६२), वार्ड क्रमांक ५ मधून शेख इस्माईल रमजान (३५२) आणि पिंगळे संगीता पोपट (३०६).

सरपंच पदाच्या विजयानंतर चकलांबा गावात सरपंच सौ. प्रियंका शिवप्रसाद प्रसाद खेडकर आणि विजयी उमेदवाराची भव्य मिरवणूक काढण्यात आली. गावातील कार्यकर्ते, नागरिक आणि युवक यांच्यासह महिलांची प्रचंड मोठी उपस्थिती होती. मिरवणुकीनंतर श्री रोकडेश्वराच्या मंदिरात श्रीफळ वाढवून व आरती करून करण्यात आले.



यावेळी कार्यकारी अभियंता शिवप्रसाद खेडकर यांनी मतदार आणि सर्व कार्यकर्त्यांचे आभार मानून विकासासाठी वचनबद्ध असल्याचे म्हटले. यावेळी सुभाष छाजेड, नारायण नागरे, उद्धव खेडकर आदींनी मनोगत व्यक्त करून विजयी उमेदवाराचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# ओबीसीचे मत फक्त ओबीसी उमेदवारालाच?

आरक्षणावरून ओबीसी-मराठा जातीय संघर्ष जेव्हा शिगेला पोहोचतो, तेव्हा दोन्ही बाजूंकडून काही अतिरेकी भुमिका घेतल्या जातात. *मराठ्यांनी भुजबळांना बळ देऊ नये*, अशी अतिरेकी घोषणा जरांगे-पाटलांनी येवल्यातील सभेत केल्यावर त्याची प्रतिक्रिया ओबीसी कार्यकर्त्यांकडून येणे स्वाभाविक आहे. *ओबीसींनी फक्त ओबीसी उमेदवारालाच मते द्यावीत, मराठा उमेदवाराला चूकूनही मत देऊ नका,* असे अतिरेकी आवाहन सोशल मिडियावर वाचायला व पाहायला मिळते.

जातीच्या आधारावर केलेला संघर्ष जातीव्यवस्था मजबूत करीत असतो. *हाच जातीय संघर्ष आपल्याला वैचारिक आधारावर करता येतो व त्यातून संघर्षाचे मूळ असलेले प्रश्न लोकशाही मार्गाने सोडविता येतात.* आपले महापुरूष तात्यासाहेब व बाबासाहेब यांनी वैचारिक भुमिका घेऊनच उच्च-जातीयांच्या अन्यायाविरोधात लढलेत, हे आपण विसरता कामा नये. परंतू ब्राह्मण-मराठ्यांचे राजकीय पक्ष व त्यांचा गुलाम मिडिया या संघर्षातील वैचारिक मुद्द्यांना दडपून टाकण्यासाठी जातीय मुद्दे उपस्थित करतात व आगीत तेल ओततात. ओबीसीचे मत ओबीसीलाच, मराठ्यांना अजिबात नाही, ही भुमिका फसवी असून ती प्रस्थापित पक्षांना फायदेशिर आहे. प्रस्थापित पक्ष हे ब्राह्मण-मराठ्यांच्याच मालकीचे आहेत, हे आपण विसरतो. *मराठा उमेदवाराला मत नाही द्यायचे, मग कोणाला मत देणार?*

सर्व प्रमुख प्रस्थापित पक्ष मराठा-ब्राह्मणांचे असलेत तरी त्यांना सत्तेची कडी बनविण्यासाठी कडीमध्ये कडीपत्ता टाकावाच लागतोच! कडी तयार झाली की कडी पत्ता फेकून द्यावा लागतो. साडेतीन टक्के लोकसंख्या असलेल्या ब्राह्मणांना व सात टक्के लोकसंख्या असलेल्या मराठ्यांना १०० टक्के सत्ता मिळविण्यासाठी ओबीसी, दलित, मुसलमान यांची मते लागतात. म्हणून त्यांना आपल्या पक्षात एक ओबीसीनेता, एक मुसलमाननेता व एक दलितनेता 'शो-पीस' म्हणून लागतो. गिर्हाईक आकर्षित करण्यासाठी शो-रूमच्या बाहेर रंगी-बेरंगी बाहुल्या ठेवलेल्या असतात. या बाहुल्या मुक्या-बहिर्या असतात. *एखाद्या मतदारसंघात मराठा-ब्राह्मणांनी शो-पीसची बाहुली म्हणून ओबीसी उमेदवार दिला असेल तर तुम्ही त्या मुक्या-बहिर्या ओबीसी उमेदवाराला निवडून द्याल का?*

काही मोजके २०-२५ मतदारसंघ सोडलेत तर बहुतेक सर्वच मतदारसंघात मराठा उमेदवार उभे असतात. सर्वच पक्ष मराठ्यांनाच तिकीटे देतात. पक्षाचे तिकीट न मिळाल्याने काही बंडखोर उमेदवार अपक्ष उमेदवार म्हणून उभे राहतात. या बंडखोरांमध्येही मराठा उमेदवारच जास्त असतात. बरेचसे बंडखोर उमेदवार पैसे खाऊन तडजोड करणारेच असतात. एखादा ओबीसी उमेदवार पक्षाचे तिकीट मिळाले नाही, म्हणून अपक्ष उभा असेल तर तोही केवळ सौदेबाजी करण्यासाठी उभा असतो. अशा अपक्ष ओबीसी उमेदवाराला ओबीसींनी मते देऊन निवडूनभी आणले तर तो आपल्या ओबीसींच्या हिताचा ठरेल काय? निवडून आल्यावर तो स्वतःच्या फायद्यासाठी आपल्या मूळ पक्षात जातो. त्याचा मूळ पक्ष एकतर काँग्रेस-राष्ट्रवादी असतो किंवा भाजप-सेना असतो. *हे चारही प्रस्थापित पक्ष ब्राह्मण-मराठ्यांचे असल्याने तुम्ही निवडून दिलेला अपक्ष ओबीसी उमेदवार शेवटी ब्राह्मण-मराठ्यांचीच गुलामी करणार!*

जातीच्या आधारावर भावनिक होउन मत देण्यापेक्षा तुमच्या हिताच्या मुद्द्यावर मत द्या! ओबीसींचा आजचा सर्वात मोठा कळीचा मुद्दा आहे, जातनिहाय जनगणनेचा! जातनिहाय जनगणना झाली तर ओबीसींचे ९० टक्के प्रश्न सहज सूटणार आहेत. त्यामुळे मत देतांना अशा उमेदवाराला मत द्या जो केवळ आणी केवळ जातनिहाय जनगणनेच्या मुद्द्यावर निवडणूक लढवतो आहे! तुम्ही विचाराल की, असा उमेदवार कुठे सापडेल? त्यासाठी आम्ही *ओबीसी राजकीय आघाडी* स्थापन केली असून बहुतेक सर्वच ओपन मतदारसंघात ओबीसी उमेदवार उभे करणार आहोत. राखीव मतदारसंघातून दलित व आदिवासी उमेदवार उभे करणार आहोत. *ओबीसी राजकीय आघाडीतर्फे उभा असलेला उमेदवार कोणत्याही जातीचा असो, किंवा कोणत्याही धर्माचा असो तो फक्त आणी फक्त जातनिहाय जनगणनेच्या मुद्द्यावरच निवडणूक लढणार असल्याने त्याला सर्व ओबीसी मतदारांनी मतदान केले पाहिजे.*

या निवडणूकीत ओबीसी राजकीय आघाडिचे उमेदवार निवडून नाही आलेत, तरी ते किमान ३० ते ४० मराठा आमदारांना निश्चितच पराभूत करतील. हा राजकीय दबाव पाहता निवडून आलेले मराठा आमदारही आपल्या जातनिहाय जनगणनेच्या मागणीला पाठींबा देतील, यात शंका नाही.

ओबीसी राजकीय आघाडीच्या उमेदवारांना मिळालेली एकूण मते एक ५० लाखाच्यावर गेलीत तर त्या दबावाखाली महाराष्ट्र शासनाला जातनिहाय जनगणना घ्यावीच लागेल.अशाप्रकारे भावनिक जातीय मतदान करण्यापेक्षा वैचारिक भुमिका घेऊन आपल्या हिताच्या मुद्द्यांवर मतदान करा!

प्रा. श्रावण देवरे,
संस्थापक-अध्यक्ष,
ओबीसी राजकीय आघाडी,
संपर्क:* ९४ २२७ ८८ ५४६

# चौसाळा येथील गुटखा प्रकारणात प्रशांत उर्फ बबलू शिंदे यांना जामीन मंजूर-अॅड. तेजस वडमारे

बीड ।प्रतिनिधी

माननीय सत्र न्यायालय बीड यांनी प्रशांत उर्फ बबलू रेवन्नाथ शिंदे यांना कलम ३२८,२७२,२७३,१८८, ३४ भा. द. वी.च्या गुन्ह्यात जामीन मंजूर केला आहे,याबाबत सविस्तर वृत्त असे की दिनांक ११ /०९/ २०२३ रोजी अंबेजोगाई पोलिसांनी चौसाळा येथील तय्यब मुजावर यांच्या चंदन टोबॅको सेंटर आणि गोडाऊन वर छापा मारून ४,४७,२६३ रुपये किमतीचा प्रतिबंधित गुटखा जप्त केला सदर गुन्ह्यात एकूण ६ लोकांविरुद्ध नेकनूर पोलीस स्टेशन येथे गु. र. नंबर २८०/२०२३ प्रमाणे गुन्हा नोंद झाला होता.

सदर प्रकरणात प्रशांत उर्फ बबलू शिंदे यांनी ड.तेजस शांताराम वडमारे यांच्या मार्फत मा. सत्र न्यायालय, बीड यांच्या न्यायालयात जामीन अर्ज क्र.१११५/२०२३ दाखल केला,



दोन्हीही बाजूंचा युक्तिवाद ऐकून मा. सत्र न्यायालय बीड यांनी बचाव पक्षाने केलेला अभ्यासपूर्ण युक्तिवाद व दिलेले न्यायनिवाडे गृहीत धरून प्रशांत उर्फ बबलू रेवन्नाथ शिंदे यांचा जामीन अर्ज मंजूर केला,

सदर प्रकरणात ड.तेजस वडमारे यांनी बचाव पक्षातर्फे काम पाहिले त्यांना ड.शेख फारुख, ड.राहुल सोळंके,ड.दिनेश जाधव यांनी सहकार्य केले..

# एकल महिला संघटनेच्या वतीने राज्यस्तरीय महिलांच्या खुल्या कबड्डी स्पर्धेचे आयोजन
## क्रीडा संकुल तुळजापूर या ठिकाणी होणार स्पर्धा

एकल महिला संघटना आयोजित राज्यस्तरीय महिलांच्या खुल्या कबड्डी स्पर्धेचे आयोजन तालुका क्रीडा संकुल तुळजापूर जि उस्मानाबाद( धाराशिव) या ठिकाणी केलेले आहे, गावपातळीवर संघ सराव सुरू करावे व महिलांनी या स्पर्धेमध्ये भाग घेऊन या सुवर्ण संधीचा लाभ घ्यावा, यामध्ये प्रथम पारितोषिक.५१.०००.हजार. द्वितीय पारितोषिक, ३१.०००.हजार. तृतीय पारितोषिक, २१.००० हजार, या ठिकाणी विजयी संघाला वरील प्रकारे बक्षीस मिळणार आहेत, यामध्ये संघ नोंदणीसाठी संपर्क करण्याचे आव्हान करण्यात आले असून संघ नोंदणी ची अंतिम तारीख १५ नोव्हेंबर २०२३ आहे असे एकल महिला संघटना च्या वतीने कळवण्यातआले आहे, यामध्ये महानंदा चव्हाण, रुक्मीन नागापुरे ( ९०४९०२५४१५) माधवीताई बनसोडे, पार्वती ताई भगत, जमीला तांबोळी, सुरेखा भोसले, अनिता नवले, मीरा नाईकवाडे, कांता शिंदे, सुवर्णा ननवरे, अर्चना पवार, आशालता पांडे, चित्रा पाटील, आम्रपाली तिगोटे, मस्तानबी शेख,



मंगल कानडे, द्रौपदी गवळे, अनुराधा आंबूरे, भाग्यश्री रणदिवे, जना काळे, आदी महिलांनी आव्हान केले आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT